कार्यालयीन परिपत्रक क्र. २६

पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.
कामगार व जनता संपर्क कार्यालय
दिनांक:- २९/ ८ /२०२४.

**विषय** : समूह वैयक्तिक अपघात विमा योजना वार्षिक वर्गणी कपात करणेबाबत.
**संदर्भ** : मा. अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक यांची दि. २९/०८/२०२४ रोजीची मान्यता.

राज्य शासकीय कर्मचाऱ्यांकरीता अपघातामुळे मृत्यु आल्यास अथवा कायम स्वरूपाचे अपंगत्व / विकलांगता आल्यास व त्यामुळे सदर कर्मचाऱ्यांच्या उपजिवीकेस धोका निर्माण झाल्यास त्याला ठोक रक्कमेच्या स्वरूपात नुकसान भरपाई देण्याकरीता शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेसाठी अपघात विमा योजना संदर्भांकित शासन आदेशान्वये दि. ०१/०४/२०१६ पासून सुरू करण्यात आली आहे. शासनाने याबाबत दिलेली योजनेची ठळक वैशिष्टे पुढीलप्रमाणे आहेत.

१) वैयक्तिक अपघात गट अ ते ड मधील सर्व अधिकारी / कर्मचाऱ्यांना लागू असेल.
२) वैयक्तिक अपघात विमा योजनेची राशीभूत विमा रक्कम रु. १० लाख इतकी असेल.
३) अपघातामुळे आलेला मृत्यु, कायमचे अपंगत्व / विकलांगता किंवा दोन हात, दोन पाय किंवा दोन्ही डोळे गमावून अपंगत्व / विकलांगता आल्यास त्यास १०० टक्के लाभ अनुज्ञेय असेल.
४) कायमचे अंशतः कायमचे अपंगत्व / विकलांगता आल्यास अपंगत्वाच्या स्वरूपानुसार लाभाची टक्केवारी विहीत करण्यात आली आहे.

या अनुषंगाने सर्व संबंधित विभागांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावयाची आहे.

अ) पुणे महानगर परिवहन महामंडळातील सर्व अधिकारी / कर्मचारी यांचे माहे ऑगस्ट २०२४ पेड इन सप्टेंबर २०२४ चे वेतनातून माहे २४ सप्टेंबर २०२४ – माहे २३ सप्टेंबर २०२५ या कालावधीसाठी समूह अपघात विमा वार्षिक वर्गणी रक्कम रू. ४०१/- (अक्षरी चारशे एक रुपये मात्र) कपात करण्यात यावी.

ब) पुणे महानगर परिवहन महामंडळाकडील अधिकारी / कर्मचाऱ्यांच्या माहे ऑगस्ट २०२४ पेड इन सप्टेंबर २०२४ चे वेतनातून सदरची रक्कम कपात करावयाची आहे. सदरच्या महिन्यांमध्ये जे सेवक गैरहजर राहतील अशा सेवकांची वर्गणी कपात न झाल्यास ते सेवक लाभांपासून वंचित राहिल्यास सदरची जबाबदारी संबंधीत सेवकाची राहील याची नोंद घ्यावी.

तरी कार्गो एफ.एल प्रणाली मार्फत सर्व अधिकारी/कर्मचारी यांची समूह अपघात विमा वार्षिक सभासद वर्गणी कपात होईल याची आहरण व संवितरण अधिकारी यांनी कटाक्षाने नोंद घ्यावी

(नितीन नार्वेकर)
सहव्यवस्थापकीय संचालक
पुणे महानगर परिवहन महामंडळ लि.

o/c

(1) भांडार पत्रक विभाग. २९/८/२४
(2) कार्गो अफ अल. २९/८/२४